Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील गळतीच्या समस्या आणि उपाय

**डॉ. बलीद उज्ज्वला शिमाने**
बी.एड्. कॉलेज ऑफ औसा

**प्रस्तावना :**

प्राचीन शिक्षणाचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, ब्राम्हण, वैश्य, क्षत्रिय व शुद्र असा आकृतीबंध तयार झाला होता. शिक्षण ही ब्राम्हणांचीच मक्तेदारी होती. बहुजन समाज त्यामुळेच अंधारात होता. १९ व्या शतकात भारतीय समाज सुधारकांनी शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. महर्षी कर्वे, आगरकर, जोतिराव फुले, पंडिता रमाबाई राजाराम मोहन रॉय यांनी लोकांच्या विरोधाला जुमानले नाही व स्त्री शिक्षणला सुरुवात केली. स्त्री संरक्षणासाठी कायदे होत होते. पण ते स्विकारण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते सती प्रथा, बालविवाह रुढी परंपरा चालूच होत्या. हे नष्ट करण्यासाठी स्त्री शिक्षणाची गरज होती. शिक्षणाने जीवन संपन्न होते ही कल्पना ब्रिटिशांच्या काळात आपणाकडे आली.

- **प्लेटो** : मानवी जीवनात शिक्षण हे आमृत आहे. सर्वांग संपूर्ण व्यक्तीमत्वाचा लोकशाहीस पूरक माणूस या संज्ञेला पात्र होईल असा नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे मुख्य प्रयोजन आहे.
- **जॉन डुई** :मानवी शक्तींना वळण लावून त्यांना समाज कार्यासाठी सक्षम करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होय.
- **पं. जवाहर लाल नेहरु** :- मुलगा शिकला तर तो व्यक्तीगत विकास साधतो. एक मुलगी शिकली तर ती सारे कुटूंब प्रगतीपथावर नेते.
- **महात्मा गांधी :-** एखादया देशातील लोकांची संस्कृती आणि सभ्यता पहायची असेल तर त्या देशातील स्त्रियांचा दर्जा आणि त्यांच्या स्थितीची पाहणी केली की पुरे.

  आज ही मुलींना (स्त्रियांना) शिक्षणाचे महत्त्व म्हणावे तितके समजले नाही. पुरुष साक्षरतेचे प्रमाण ७५.८५ टक्के तर स्त्रीयांचे ५४.१६ टक्के आहे. शिक्षणाची स्थिती सुधारत असली तरी हे प्रमाण समाधान कारक नाही.

**उद्दिष्टे :**

- ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील गळतीचा अभ्यास करणे.
- ग्रामीण भागातील मुलींचा शिक्षणा बाबतचा दृष्टीकोन अभ्यासणे.
- ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील गळतीच्या कारणांचा शोध घेणे.
- ग्रामीण भागातील मुलींच्या शाळेतील गळतीच्या समस्यांवर उपाय योजना सुचविणे.

**गृहीतके :**

- आर्थिक विषमतेमुळे मुलींची शिक्षणात उदासीनता आहे.
- लहान भावडांना सांभाळण्यासाठी मुलींना शिक्षणा पासून वंचित रहावे लागते.
- प्राथमिक स्तरावरील मुलींना भौतिक सुख सुविधा उपलब्ध होत नाहीत.
- प्राथमिक स्तरावरील मुलींना शैक्षणिक मार्गदर्शन मिळत नाही.
- प्राथमिक स्तरावरील मुलींना आरोग्य समस्या, सामाजिक समस्या असतात.
- मुलींच्या शिक्षणासाठी काही पालक उदासीन असतात.
- मुलींना शिक्षणासाठी परगावी जाण्यास काही पालक परवानगी देत नाहीत.

**ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणातील आव्हाने :**

- बऱ्याच वेळा ग्रामीण भागातील मुलींचे लग्न शिक्षण पूर्ण होण्याआधी केले जाते.
- मुलगी शिकून काय उपयोग ? हा विचार असतो.
- मुलींना समाजात व घरात मुलांच्या तुलनेत दुय्यम स्थान दिले जाते.
- मुलींचा घरकाम व शेतात उपयोग करुन घेतला जातो.

अशा अनेक समस्या मुळे मुलींचे शिक्षणातील प्रमाण कमी आहे. मुलींच्या शिक्षणा संदर्भात भारतामध्ये आरोग्य, समित्या झाल्या (१९५२-५३ मुदलियार आयोग, १९६४-६६ कोठारी आयोग, १९८६ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण) तरी ही समस्या सुटल्या नाहीत.

**उपाय योजना :**

- मुलींच्याशिक्षणासाठी विविध स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहेत. त्यासाठी काही उपाय योजना सुचवित आहे.
- पालकांमध्ये प्रबोधन करुन मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन करणे.
- शाळेत स्त्रीशिक्षण विषयक चर्चास्त्रे, वादविवाद स्पर्धा आयोजित करुन प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे.
- मुलींच्या मोफत शिक्षणा विषयीच्या योजना व त्यांची अमलबजावणी होते की नाही ? ते पाहणे शिक्षण हा स्त्रीयांचा मूलभूत हक्क आहे. याची जाणीव त्यांना करुन देणे.
- ग्रामीण भागात भौतिक सुविधा युक्त शाळेस प्राधान्य देणे.
- वर्षातून दोन वेळा अरोग्य विषयक शिबीराचे आयोजन करणे.
- स्व संरक्षण, कायदे विषयक, अंधश्रध्दा, आपत्ती व्यवस्थापन अशा प्रकारच्या शिबीरातून प्रबोधन कार्यक्रम घेणे.
- पालक, शिक्षकांच्या शिबीराचे आयोजन करणे.

**निष्कर्ष :**

- आर्थिक बाबीमुळे मुली शैक्षणिक साहित्य घेऊ शकत नाही.
- ग्रामीण भागातील-जास्तीत जास्त पालक निरक्षर आहेत.
- पालक आर्थिक मदतीसाठी मुलींना घरकाम व शेतीकामासाठी लावतात.
- शालेय परिसर व वातावरण आकर्षक नाही.
- बोलीभाषा व शिक्षणाचे माध्यम वेगळे आहे.
- कौटुंबिक वातावरण अशैक्षणिक आहे.

**सारांश :**

इ.स. २००० मध्ये शासनाने निर्णय घेऊन शाळेच्या दाखल्यावर वडीलांच्या नावाबरोबर आईचेही नाव लावण्याची सक्ती केली. परंतु महिला सक्षम झाल्या असे म्हणता येणार नाही. स्त्रीला सन्मान दिल्यास राष्ट्र मोठे होते. त्यानुसार राष्ट्रच्या विकासास स्त्रियांचे स्थान महत्वपूर्ण आहे. त्यासाठी महिला सक्षम होणे काळाची गरज असून शिक्षणासारख्या प्रभावी माध्यमातून त्यांना सक्षम बनविणे आवश्यक आहे. शिक्षणाने मूली स्वावलंबी बनू शकतात, अन्याय, अत्याचार, शारिरिक मानसीक शोषणाची त्यांना जाणीव होते त्यांचे सबलीकरण करणे महत्वाचे आहे. स्त्री निरीक्षर राहीली तर त्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबाला सहन करावे लागतात. आहार, आरोग्य, आर्थिकता, सामाजिकता, सवयी या वर वाईट परिणाम होतो. म्हणून ग्रामीण भागातील मुलींना योग्य शिक्षण मिळणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :-**

१. प्रा. डॉ. शिला स्वामी, ग्रामीण भागातील स्त्रियांचे उच्च शिक्षण समस्या व उपाय, रिसर्च एरिया Vol-5
२. घाटवाले एम.एस. २००६ महिला सक्षमीकरणामध्ये शाळा व शिक्षकांची भूमिका शिक्षण, संक्रमण
३. प्राचार्य नागोराव कुंभार, शैक्षणिक समस्या व उपाय, प्रबोधन प्रकाशन लातूर -१९९३.
४. डॉ. न.रा. पारसनीस शिक्षणाची तात्विक व सामाजशास्त्रीय भूमिका नूतन प्रकाशन पुणे-१९९७.